आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
८ सप्टेंबर २०२६ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्र्यांच्या हस्ते वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉरच्या ३ टप्प्यांचं लोकार्पण

- जवाहरलाल नेहरू बंदराला जोडणाऱ्या महाराष्ट्रातल्या कॉरिडॉरचं उरण इथं उद्घाटन

- रशियाने युक्रेनवर केलेल्या क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ल्यात २ जण ठार, किमान १० जखमी

**आणि**

- अग्रमानांकित जर्मन टेनिसपटू अलेक्झांडर झ्वेरेव अमेरिकन खुल्या स्पर्धेच्या उपान्त्यपूर्व फेरीत दाखल

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज गुजरात आणि महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉरच्या ३२६ किलोमीटर लांबीच्या तीन महत्त्वाच्या टप्प्यांचं लोकार्पण प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं. न्यू साणंद ते न्यू मकरपुरा, न्यू उंबरगाव ते न्यू सफाळे आणि न्यू सफाळे ते न्यू जेएनपीटी हे ते तीन टप्पे आहेत. सुमारे २० हजार ७०० कोटी रुपयापेक्षा अधिक खर्चातून हे टप्पे विकसित करण्यात आले आहेत. याशिवाय न्यू साणंद, न्यू मकरपुरा, न्यू उंबरगाव आणि न्यू जेएनपीटी इथल्या मालवाहू रेल्वे सेवांना तसंच, टांडा रोड ते वडोदरा दरम्यानच्या नवीन रेल्वे सेवेलाही त्यांनी हिरवा झेंडा दाखवला.

वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडोर हा गेल्या बारा वर्षांत देशाच्या बदललेल्या कार्यसंस्कृतीचं प्रतीक असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी वडोदरा इथून केलं. आपण यंदा लाल किल्ल्यावरून विकासाच्या संकल्पाच्या सप्तधारांचा उल्लेख केला होता. त्यातली एक धारा ही गतिशक्तीची आहे. विकसित भारतासाठी वेगवान आणि सुलभ दळणवळणाची गरज आहे. हा कॉरिडोर पूर्ण होणं हा विकसित भारताच्या प्रवासातला एक महत्त्वाचा टप्पा असल्याचं प्रधानमंत्री म्हणाले.

**होल्ड - बाईट - प्रधानमंत्री**

या कॉरिडोरची संकल्पना माजी प्रधानमंत्री दिवंगत अटलबिहारी वाजपेयी यांच्या काळात मांडलेल्या सुवर्ण चतुष्कोन प्रकल्पाचा भाग आहे, मात्र, २०१४ पर्यंत या मार्गाचं काम सुरू

झालं नव्हतं. मात्र त्यानंतर सर्व अडचणींना दूर करून कॉरिडोरचं काम पूर्ण झाल्याचं रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं.

वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉरच्या तिसऱ्या टप्प्यात येणाऱ्या जेएनपीटी बंदर परिसरातही महाराष्ट्र सरकारने या कॉरिडोरच्या लोकार्पणाचा कार्यक्रम आयोजित केला होता. वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर हा सुमारे पंधराशे किलोमीटर लांबीचा, पाच राज्यांना जोडणारा आणि १ लाख ३० हजार कोटी रुपये खर्चाचा रेल्वे कॉरिडोर असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले. या कॉरिडोरमुळे उत्तर भारताला पश्चिम भारताशी जोडलं जाणार असून जेएनपीटी बंदरावरून होणाऱ्या मालवाहतुकीचा विस्तार भारताच्या अन्य भागांमध्येही होणार आहे, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. या कॉरिडोरविषयी मुख्यमंत्री म्हणाले…

**होल्ड - बाईट - मुख्यमंत्री**

वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉरमुळे मालवाहतुकीचं जाळं आणखी मजबूत होणार असल्याचं राज्यपाल जिष्णु देव वर्मा म्हणाले. या कॉरिडोरमुळे मालवाहतुकीवरचा खर्च कमी होऊन पुरवठा साखळीही मजबूत होणार असल्याचं राज्यपाल म्हणाले. यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येत असून मुंबईत ग्लोबल फिनटेक फेस्ट २०२६चं उद्घाटन करणार आहेत. ही परिषद जगातल्या सर्वात मोठ्या आणि प्रभावशाली फिनटेक परिषदांपैकी एक आहे. चार दिवस चालणाऱ्या या परिषदेची सांगता येत्या ११ तारखेला होणार आहे. या परिषदेत धोरणकर्ते, नियामक घटक, मध्यवर्ती बँका, वित्तीय संस्था, फिनटेक कंपन्या, तंत्रज्ञान कंपन्या, गुंतवणूकदार, शैक्षणिक क्षेत्रातले तज्ज्ञ आणि इतर संबंधितांमध्ये वित्त क्षेत्राच्या भविष्याबाबत चर्चा होणार आहे.

**<><><><><>**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आजपासून तीन दिवस श्रीलंकेच्या दौऱ्यावर जाणार आहेत. भारत आणि श्रीलंकेदरम्यान दीर्घकाळापासून असलेली भागीदारी तसंच उभय देशांतले ऐतिहासिक आणि सांस्कृतिक संबंध महत्त्वाचे आहेत असं राजनाथ सिंह यांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या संदेशात म्हटलं आहे.

भारताच्या नेबरहुड फर्स्ट आणि महासागर या उपक्रमातला श्रीलंका हा अत्यंत महत्त्वाचा भागीदार असल्याचंही सिंह यांनी संदेशात म्हटलं आहे. श्रीलंकेबरोबर फलदायी

आणि सकारात्मक चर्चा होईल, अशी अपेक्षा राजनाथ सिंह यांनी व्यक्त केली आहे. या दौऱ्यात ते श्रीलंकेतल्या भारतीय नागरिकांशी ही संवाद साधणार आहेत.

<><><><>

आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित्त आज सर्वत्र विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. साक्षरता लोकांसाठी, पृथ्वीसाठी आणि समृद्धीसाठी अशी यंदाची संकल्पना आहे. युनेस्कोतर्फे दिले जाणारे आंतरराष्ट्रीय साक्षरता प्रसार पुरस्कार आज मेक्सिकोमधे प्रदान करण्यात येणार आहेत. साक्षरता दिनानिमित्त दिलेल्या संदेशात केंद्रीय शिक्षणमंत्री प्रल्हाद जोशी यांनीम्हटलं आहे, की साक्षरतेमुळे ज्ञान, संधी आणि उज्ज्वल भविष्याचे दरवाजे उघडतात, सुशिक्षित आणि सक्षम नागरिक हा विकसित भारताचा भक्कम पाया असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

<><><><>

युक्रेनवर ७२ तास हल्ले न करण्याची घोषणा केल्यानंतर रशियाने काल रात्री कीव्ह वर केलेल्या ड्रोन आणि क्षेपणास्त्र माऱ्यात दोन जणांचा मृत्यू झाला, तर किमान १० जण जखमी झाले. कीव्ह शहरातल्या १६ ठिकाणी लष्करी आणि नागरी आस्थापनांचं या हल्ल्यात नुकसान झाल्याचं युक्रेनच्या लष्करी सूत्रांनी सांगितलं. काही इमारती कोसळल्या तर काही ठिकाणी आगी लागल्या. घटनास्थळावरुन १० जणांची सुखरुप सुटका केली असल्याचं युक्रेनच्या प्रशासनाने सांगितलं.

<><><><>

इराणने अतिरीक्त पेट्रोल खरेदी करणाऱ्या ग्राहकांसाठी इंधनाच्या दरात वाढ केली आहे. डिसेंबरनंतरची ही दुसरी दरवाढ आहे. नव्या व्यवस्थेनुसार, महिन्याला ११० लिटरपेक्षा अधिक पेट्रोल खरेदी करणाऱ्यांना प्रति लिटर एक लाख रियाल मोजावे लागणार असून, हा दर आधीच्या तुलनेत दुप्पट आहे. ढासळता चलन दर आणि घटत्या क्रयशक्तीच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेतला आहे. पेट्रोलच्या दरवाढीमुळे महागाई आणखी वाढण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

<><><><>

दिल्ली विद्यापीठाशी संलग्न असलेल्या सर्व महाविद्यालयांमध्ये वसतीगृहांची मागणी करणाऱ्या जनहित याचिकेवर तातडीनं सुनावणी घ्यायला दिल्ली उच्च न्यायालयानं आज

नकार दिला. दिल्ली विद्यापीठ परिसराजवळ सत्य निकेतन इथं एका पीजीची इमारत कोसळून ७ जण ठार झाल्याच्या पार्श्वभूमीवर ही याचिका दाखल करण्यात आली होती. याच प्रकारच्या एका जनहित याचिकेवर काल सुनावणी झाली असून ही नवी याचिका उद्या सुनावणीसाठी घेतली जाईल, असं मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय यांच्या नेतृत्वातल्या पीठानं स्पष्ट केलं.

<><><><><>

भारतीय महिला हॉकी संघ आशियाई स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आज जपानला रवाना झाला. संघाचं नेतृत्व सलीमा टेटे हिच्याकडे असून शोर्ड मारिन हे संघाचे प्रशिक्षक आहेत. आशियाई स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारा संघ २०२८ मध्ये लॉस ऐंजलिस इथं होणाऱ्या ऑलिम्पिकसाठी थेट पात्र ठरणार असल्यानं, हे पदक जिंकण्याचं उद्दिष्ट्य संघानं ठेवलं आहे. सलीमा टेटे हिच्या नेतृत्वाखाली भारतीय महिला हॉकी संघानं विश्व चषक स्पर्धेत पाचवं स्थान मिळवलं होतं. त्यामुळे सर्वांचं लक्ष संघाच्या कामगिरीकडे लागलं आहे.

<><><><><>

अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत जर्मनीच्या अलेक्झांडर झ्वेरेव याने इटालीच्या लुसियानो डारडेरी याला ६-२, ६-२, ७-६ असं हरवून उपान्त्य पूर्व फेरीत प्रवेश केला आहे. उपान्त्य पूर्व फेरीत त्याचा सामना नेदरलँड्सच्या बोटिक वॅन डे जँडशल्प याच्याशी होईल.

<><><><><>

प्रसिद्ध संगीतकार डॉ. भूपेंद्र हजारिका यांच्या १००व्या जयंतीनिमित्त आज त्यांना आदरांजली वाहण्यात येत आहे. ईशान्य भारतातलं लोकसंगीत आपल्या चालींमधून अजरामर करणारे हजारिका यांना भारतरत्न सन्मान प्रदान करण्यात आला होता. उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंग, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा या मान्यवरांनी समाजमाध्यमांवर हजारिका यांना आदरांजली वाहिली आहे.

<><><><><>

स्वयंपाकाच्या गॅस सिलेंडरची मागणी नोंदवण्यासाठीचा कालावधी आता शहरी आणि ग्रामीण भागांसाठी २५ दिवसांचा असा समान असणार आहे. केंद्र सरकारने तेल विपणन

कंपन्यांना त्वरित आणि एकसमान वितरणासंदर्भात निर्देश दिले असल्याची माहिती पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू राज्यमंत्री सुरेश गोपी यांनी समाजमाध्यमावर दिली.

**//<><><><><>//**